# जागतिक भ्रष्टाचारविरोधी धोरण
# GEC-02

**लागू: जून 29, 2012**

वॉलमार्ट इंक. आणि तिच्या दुय्यम कंपन्या आणि संयुक्त राष्ट्रामधील त्यांचे सहयोगी आणि आंतरराष्ट्रीय संचालन (एकत्रितपणे “वॉलमार्ट” किंवा “कंपनी”) हे शक्य असलेली सर्वोच्च नीतिमत्ता मानके राखणे आणि सर्व लागू होणाऱ्या कागद्यांसोबत अनुपालन करण्यासाठी वचनबध्द आहेत. तिच्या सर्व कार्यांमध्ये, वॉलमार्ट हे तिचे कोणतेही अधिकारी, संचालक, असोसिएट्स, कर्मचारी, एजंट्स किंवा प्रतिनिधींच्या कृतींच्या बाबतीत अनौचित्य देखील टाळण्याचा प्रयत्न करते. हे धोरण सरकारी अधिकारी किंवा खाजगी क्षेत्रामधील व्यक्तींसोबत व्यवहार करताना सर्व परिस्थितींमध्ये, संयुक्त राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय कार्यांमध्ये भ्रष्ट प्रदानांना मनाई करते.

## सामान्य निर्देश

युएस फॉरेन करप्ट प्रॅक्टीसेस अॅक्ट ("FCPA") आणि युके ब्रायबरी अॅक्ट यांच्यासह, पण तितकेच मर्यादित न राहता सर्व संबंधित भ्रष्टाचार विरोधी कायद्यांचे पालन करणे हे वॉलमार्टचे धोरण आहे. त्यानुसार, वॉलमार्ट हे कंपनीच्या वतीने काम करणाऱ्या कोणालाही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, अयोग्य प्रदान करणे किंवा मिळवण्यास मनाई करते.

अयोग्य पेमेंट्स म्हणजे लाच मिळवणे किंवा प्रदान करणे, किंवा कोणत्याही व्यक्तीला पैसे किंवा मूल्याच्या रूपात काहीही देणे, ऑफर करणे किंवा आश्वासन देणे, ज्यामध्ये व्यक्तीची कोणतीही कृती किंवा निर्णयावर अयोग्यपणे प्रभाव टाकण्यासाठी किंवा अन्यथा कंपनीसाठी अयोग्य लाभ मिळवण्यासाठी कोणत्याही सरकारी अधिकारी यांचा समावेश होतो.

सरकारचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी, सार्वजनिक आंतरराष्ट्रीय संघटनेचा अधिकारी किंवा कर्मचारी, राजकिय पक्षाचा सदस्य, राजकीय कार्यालयासाठी उमेदवार किंवा राज्याच्या मालकीच्या व्यवसाय संस्थेचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांचा समावेश सरकारी अधिकाऱ्यांमध्ये होतो, पण ते तितकेच मर्यादित नसतात.

वॉलमार्टचा निधी किंवा मालमत्तेचा वापर कोणत्याही बेकायदेशीर, अयोग्य किंवा अनैतिक हेतूसाठी करण्यास सक्तीने मनाई केलेली आहे.

कंपनीच्या वतीने सरकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधू शकतात असे सर्व सहयोगी आणि तृतीय पक्षांना या जागतिक भ्रष्टाचार ओधी धोरणाचे ("धोरण") पालन करण्याची आवश्यकता असते. वॉलमार्टच्या व्यवसायाशी संबंधित सर्व गतिविधींमध्ये सर्व असोसिएट्स हे ते ज्या तृतीय पक्षांशी संवाद साधतात त्यांना धोरण पूर्णपणे समजले असल्याची आणि ते त्याचे पालन करत असल्याची खात्री करण्यास जबाबदार असतील.

## उल्लंघन

वॉलमार्टच्या व्यवसायाशी संबंधात पॉलिसीचे उल्लंघन करणारा कोणताही असोसिएट किंवा तृतीय पक्ष हा शिस्तभंगाच्या उपायांसाठी अधीन असेल, ज्यामध्ये असोसिएटच्या बाबतीत नोकरी संपुष्टात येण्यापर्यंत आणि त्यासह तृतीय पक्षाच्या बाबतीत व्यावसायिक संबंध संपुष्टात आणणे आणि, जेथे सुयोग्य असेल त्याप्रमाणे, प्रकरणाबाबत संबंधित कायदा लागू करणाऱ्या प्राधिकरणांना संदर्भित करण्याचा समावेश होतो.

## भ्रष्टाचारविरोधी कार्यक्रमाची जागतिक अंमलबजावणी

धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी, वॉलमार्ट हे लाचखोरी आणि नोंदी ठेवण्याच्या उल्लंघनाला प्रतिबंध करणे, शोधणे आणि उपाय करण्यासाठी तयार केलेल्या प्रभावी जोखीम-आधारित जागतिक भ्रष्टाचारविरोधी कार्यक्रम ("कार्यक्रम") राखून ठेवेल. कार्यक्रमाचा भाग म्हणून, वॉलमार्ट हे तिच्या कार्यांसाठी अस्तित्त्वात असलेल्या भ्रष्टाचाराच्या जोखमींना  विशेषतेने लक्ष्य करण्यासाठी कार्यकारी पध्दतींचा स्वीकार करेल. प्रत्येक प्रभावित क्षेत्रामधील व्यवस्थापन हे प्रभावी अनुपालन कार्यक्रम राखण्यासाठी योग्य संसाधने समर्पित आहे याची खात्री करण्यासाठी जबाबदार असतील. वॉलमार्ट इंक. येथील वरिष्ठ कार्यकाऱ्यांना, कार्यक्रमासाठी एकंदर जबाबदारी देण्यात येतईल आणि ते वॉलमर्ट इंक. च्या संचालक मंडळाच्या ऑडीट समितीला नियमितपणे रिपोर्ट करतील, जे कार्यक्रमाची अंमलबजावणी आणि प्रभावीपणासाठी वाजवीपणे निरीक्षण करेल.

धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी वापरलेल्या पध्दती आणि नियंत्रण, यांमध्ये कमीत कमी यांचा समावेश असेल:

1. वितरणे ही अयोग्य हेतूंसाठी केली गेलेली नाही याची खात्री करण्यासाठी निधी आणि इतर मालमत्तांच्या वितरणावर प्रभावी नियंत्रणे;
2. पुस्तके आणि नोंदी या अचूकपणे मालमत्तांची व्यवस्था दर्शवत असल्याची खात्री करण्यासाठी उपाय;
3. वॉलमार्टच्या आचार संहितेमध्ये समाविष्ट केल्याप्रमाणे वर्तणूकीचे स्पष्टपणे सांधलेली मानके, जी वॉलमार्टच्या सर्व कार्यांमध्ये चांगल्याप्रकारे प्रकाशित केली जातील.
4. अनुपालन पध्दतींच्या दैनंदिन व्यवस्थापन आणि अंमलबजावणीसाठी स्पष्टपणे व्याख्यिलेल्या भूमिका, जबाबदाऱ्या, आणि रिपोर्टींग लाइन्स;

5. कार्यकारी, असोसिएट्स आणि तेथे सुयोग्य असेल त्याप्रमाणे, तृतीय पक्षांचे संबंधित भ्रष्टाचारविरोधी मानके आणि पध्दतींच्या बाबतीत प्रभावी प्रशिक्षण;
6. सरकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधतात त्या कार्यांसाठी खर्चांच्या आढाव्यासह, भ्रष्टाचाररोधी पध्दतींसह अनुपालनासाठी अंतर्गत ऑडीट किंवा तृतीय पक्षाद्वारे तपासणी;
7. वार्षिकरित्या आयोजित केलेले भ्रष्टाचाराच्या जोखमींची मूल्यांकने;
8. कंपनीच्या वतीने सरकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधण्यामध्ये गुंतलेल्या तृतीय पक्षांचे जोखीम-आधारित योग्य व्यासंग आयोजित करणे;
9. वास्तविक आणि संभाव्य भ्रष्टाचारविरोधी मुद्दे कळवणे किंवा त्याबाबत मार्गदर्शन मिळवण्याची पध्दत, तसेच असे अहवाल किंवा विनंत्यांना प्रतिसाद देण्याची पध्दतही प्रभावीपणे प्रकाशित केली जाते;
10. नियमित आढावा आणि, जर गरज असेल, तर हे धोरण आणि जेथे सुयोग्य वाटेल तेथे संबंधित पध्दतींमधील सुधारणा किंवा अद्यतने, यामध्ये कायदेशीर, नियामक किंवा उद्योगक्षेत्र बदल किंवा या धोरणाच्या उल्लंघनाला प्रतिसादही समाविष्ट होतो.
11. अनुक्रमे संबंधित धोरण आणि संबंधित पध्दतींचे पालन किंवा उल्लंघनासाठी सहयोगी, कार्यकारी आणि तृतीय पक्षांसाठी सुयोग्य प्रलोभने आणि दंड.

## रिपोर्टींग करणे

प्रत्येक असोसिएट किंवा तृतीय पक्ष ज्याच्याकडे या धोरणाचे उल्लंघन केले गेले आहे अशी माहिती असेल किंवा त्याला किंवा तिला लाचेचे प्रदान करण्याचे किंवा ती मिळवण्याचे विचारले जात असेल, किंवा या धोरणाच्या विरुध्द जाऊन कार्य करायला सांगितले जात असेल तर त्यांनी त्या घटनेबाबत ताबडतोब जागतिक नीतिमत्ता आणि अनुपालनाला कळवावे. भ्रष्टाचाररोधी पध्दतींचे संशयित उल्लंघनही बाजार भ्रष्टाचारविरोधी अनुपालनाला कळवले जाईल.

नीतिमत्ता आणि अनुपालनाच्या सर्व अहवालांना शक्य असेल त्याप्रमाणे गोपनीयतेने हाताळले जाईल. तुम्ही स्वत:ला ओळखलेत तर हे पाठपुराव्यासोबत मदत करते. जर स्वत:ची ओळख देण्यास सोयीचे वाटत नसेल, तर तुम्ही कायद्याने परवानगी असेल त्या मर्यादेपर्यंत नैतिकता हेल्पलाइनला निनावी अहवाल देऊ शकता.

जागतिक नीतिमत्ता आणि अनुपालनासाठी संपर्क माहिती ही खालील चौकटीमध्ये समाविष्ट आहे:

**उल्लंघन किंवा विनंती नोंदवणे**

वॉलमार्टची जागतिक नीतिमत्ता हेल्पलाइन दूरध्वनी: 800-WM-ETHIC

(800-963-8442) (युएस, कॅनडा आणि पोर्तो रिको, किंवा आमच्या संहितेच्या शेवटी सूचीबध्द केलेला तुमचा स्थानिक दूरध्वनी क्रमांक):

मेल: लक्ष द्या: Global Ethics & Compliance, 702 SW 8th Street, Bentonville, AR 72716-0860 वेब: www.walmartethics.com किंवा

इमेल: ethics@walmart.com

विशिष्ट देश संपर्क माहिती ही www.walmartethics.com वर देखील मिळू शकते

जरी तुम्ही प्रामाणिक चूक केली असली, तरी सद्भावनेने समस्येबाबत माहिती दिल्यास त्यामुळे तुम्हाला त्रास होणार नाही. माहित असूनही चूकीची माहिती देणे हे आपली मूल्यांच्या विरोधात आहे आणि ते शिस्तभंगाच्या कारवाईला अधीन असेल. आणखी, जो कोणी संशयित उल्लंघनाची माहिती देतो तो त्याने वॉलमार्टच्या कोणत्याही धोरण किंवा पध्दतीचे ज्या मर्यादेपर्यंत उल्लंघन केले आहे त्यानुसार तो शिस्तभंगाच्या कारवाईस अधीन असेल.